महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९९४१९

ई-मेल-desk19@dtemaharashtra.gov.in. वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: १९/तंशिसं/उमा/२०२१/६० दिनांक : 15 SEP 2021

प्रति,
संचालक / प्राचार्य
उन्नत महाराष्ट्र अभियानांतर्गत सर्व संस्था
(सोबतच्या यादीप्रमाणे)

विषय : वर्ष २०१९-२० व २०२०-२१ मध्ये उन्नत महाराष्ट्र अभियानांतर्गत राबविलेल्या प्रकल्पांबाबत...

संदर्भ : शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक: बैठक-३६११/(५६/१५)/तांशि-२ दिनांक १३ जानेवारी, २०१६

महोदय,

महाराष्ट्र राज्यातील विविध सामाजिक व विकासाशी संबंधित दैनंदिन जीवनातील समस्यांवर तंत्रज्ञानाचा वापर करुन तोडगा शोधण्यासाठी राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने व अन्य शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थ्यांना सहभागी करुन उपाय शोधण्यासाठी उपरोक्त संदर्भाधिन क्र. १ च्या दिनांक १३ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये उन्नत महाराष्ट्र अभियान (UMA) ही योजना राबविण्यास मान्यता देण्यांत आली आहे.

या योजनेसाठी सदरच्या शासन निर्णयामध्ये खालील उद्दिष्ट्ये नमूद करण्यांत आलेली आहेत.

१) स्थानिक पातळीवरील समस्यांची उचित तंत्रज्ञानाचा वापर करुन उकल करण्यासाठी तसेच संशोधनाव्दारे विकासासाठी चालना देण्यासाठी आणि या क्षेत्रात कार्यरत विविध शासकीय यंत्रणांची मदत उपलब्ध होण्यासाठी व्यासपीठ निर्माण करणे.

२) उच्च व तंत्र शिक्षण संस्थांतील अभ्यासक्रम आणि संशोधन स्थानिक पातळीवरील विकासयोजना / समस्यांशी एकरेखित (Align) करणे / त्यांची सांगड घालणे.

३) निवड केलेल्या संस्थांमध्ये त्या-त्या परिसरातील समाजाच्या विकास विषयक समस्यांवर संशोधन करण्यासाठी तंत्रज्ञान आणि विकास कक्ष स्थापित करणे आणि राज्य स्तरावर या संशोधनाच्या अनुषंगाने माहिती-कोष तयार करुन तो सामान्य नागरिकांना देखील सुलभ होईल, अशा पध्दतीने जतन करणे.

सदर योजनेंतर्गत संचालनालयात आयोजित करण्यांत आलेल्या चौथ्या राज्य सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये आपल्या संस्थेमार्फत वर्ष २०१९-२० व २०२०-२१ मध्ये राबविलेल्या प्रकल्पांचा आढावा घेतला असता, असे निदर्शनास आले आहे की, शासन निर्णय दिनांक १३ जानेवारी, २०१६ मध्ये नमूद केलेल्या उपरोक्त ३ उद्दिष्टांपैकी उद्दिष्ट क्र. ३ मध्ये नमूद केलेला तंत्रज्ञान आणि विकास कक्ष प्रत्येक संस्थेत स्थापित केलेला आढळून आला नाही. त्यामुळे सदर कक्षामार्फत उद्दिष्ट क्र. ३ मध्ये नमूद केलेली पुढील कार्यवाहीसुध्दा संस्थांकडून करण्यांत आलेली नाही.

तसेच सदरच्या शासन निर्णयात संस्थांनी अभियानांतर्गत हाती घ्यावयाच्या प्रकल्पांची वर्गवारीही नमूद केलेली आहे. त्या अनुषंगाने सदरच्या बैठकीत आपल्या संस्थेमार्फत राबविण्यांत आलेले प्रकल्प शासन निर्णयात

Prof S.M. Patil (civil) take immediate necessary action & report 16.10.21

नमूद केलेल्या कोणकोणत्या प्रकल्पांच्या वर्गवारीत मोडतात याबाबतचे विश्लेषण केले असता असे आढळून आले की, बऱ्याचश्या संस्थांनी राबविलेले काही प्रकल्प हे शासन निर्णयात दिलेल्या प्रकल्पांच्या वर्गवारीत बसत नाहीत.

तरी, या अनुषंगाने आपणांस खालीलप्रमाणे निर्देश देण्यांत येत आहेत

१) संदर्भाधिन दिनांक १३ जानेवारी, २०१६ मध्ये नमूद केल्यानुसार आपल्या संस्थेत विज्ञान व तंत्रज्ञान कक्षाची स्थापना त्वरीत करण्यांत यावी तसेच सदर कक्षामार्फत संशोधनाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करुन जिल्हा नियोजन योजनांमधून यासाठी निधी उपलब्ध करुन घेण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

२) सदर अभियानांतर्गत कार्यक्रम राबविताना शासन निर्णयात नमूद केलेली उद्दिष्ट्ये आणि सुचविलेले प्रकल्प यांचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

आपला

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा. मुंबई

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :
सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर